12 JUL 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समाज परिवर्तनात शिक्षकांचे योगदान महत्त्वाचे

## डॉ. विलास शिंदे

**गडहिंग्लज / प्रतिनिधी :** शिक्षण तसेच कला क्षेत्रात काम करणाऱ्यांनी समाज प्रबोधन करताना स्वतः व्यसनापासून कायम दूर राहिले पाहिजे. कुठल्या ना कुठल्या क्षेत्रात गुंतवून घेतले पाहिजे. चांगले कार्य करणाऱ्या शिक्षकांचा समाज नेहमीच सन्मान करतो. मात्र, अशा शिक्षकांचे कार्य व त्यांचे शैक्षणिक जगतात काही तरी वेगळेपणा असला पाहिजे. त्यांनी आपली वेगळी वाट निवडली पाहिजे. आजच्या शिक्षकांनी स्वःवरची जबाबदारी ओळखून कार्य करावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे उप-कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी केले.

त्रिवेणी सांस्कृतिक, शैक्षणिक व क्रीडा संस्थेनेमार्फत उत्तूर (ता. आजरा) येथे गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी गोकुळचे संचालक रवींद्र आपटे होते.

मान्यवरांच्या हस्ते ज्ञानेश्वर प्रतिमेचे पुजन करण्यात आले. श्रीकांत नाईक यांनी स्वागत केले. यावेळी दादा नाईक गुणवंत शिक्षक पुरस्कार भाऊसाहेब शिंदे (माध्यमिक शिक्षक), डॉ. जे. पी. नाईक पुरस्कार अनुजा बेळगुद्री (माध्यमिक विभाग), अशोक देसाई (प्राथमिक विभाग), बाबा व सौ. साधना आपटे सामाजिक कृतज्ञता पुरस्कार प्रा. पी. डी. पाटील, अरविंद देसाई यांना देण्यात आले. तर सदानंद पुंडपळ यांच्या 'सुंभ जळला तरी' या पुस्तकाचे प्रकाशन विलास शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. तर श्वेता परुळेकर यांना महाराष्ट्र युवा पुरस्कार मिळाल्याबद्दल, ऐश्वर्या सुतार यांनी निबंध स्पर्धेत राष्ट्रीय पातळीवर प्रथम क्रमांक आल्याबद्दल, दहावी परीक्षेत शंभर टक्के गुणांनी उत्तीर्ण झाल्याबद्दल रोहिणी शेवाळे व क्षितिजा मोदी, शिष्यवृत्तीमध्ये राज्यात प्रथम क्रमांक आल्याबद्दल तन्वी शिंदे हिचा सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रा. किसन कुराडे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास त्रिवेणी संस्थेचे अध्यक्ष टी. के. पाटील, सरपंच हर्षदा खोराटे, रेखा पोतदार, रवींद्र जोशी, राम देशपांडे, रजनी हिरळीकर, अरुण कोटगी-बेनाडीकर, अरविंद देशपांडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होत. महेश करंबळी यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JUL 2017
महाराष्ट्र टाईम्स

# मॅडम प्रेसिडेंट

महिलांचा राजकारणातील सहभाग हा जगभरात महत्त्वाचा विषय मानला जातो. भारतात स्थानिक स्वराज्य संस्था ते संसदेपर्यंतच्या महिलांच्या राजकीय



सहभागाचा अभ्यास हा प्रादेशिक स्तरावर होत आहे. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत पुरुषांच्या बरोबरीने महिलांनी सहभाग घेतला. देश स्वतंत्र झाल्यावर राजकीय फायदे पुरुषांच्या बरोबरीने महिलांना मिळायला हवेत, ही अपेक्षा तत्कालीन महिला नेतृत्वाने करणे संयुक्तिक होते. केवळ मतदानाचा हक्क देणे, एवढाच राजकीय सहभागाचा अर्थ नसून प्रत्यक्ष विविध राजकीय पदांवर कार्य करण्याची संधी महिलांना मिळाली पाहिजे, हा व्यापक विचार यामध्ये आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या 'यूएन वुमन'च्या ताज्या आकडेवारीनुसार, जागतिक राजकीय नेतृत्वामध्ये महिलांचा सहभाग गेल्या वीस वर्षांत वाढला आहे. जगातील देशांच्या संसदेत २२.८ टक्के महिला सदस्य आहेत, तर १० महिला राष्ट्रपती, तर नऊ महिला पंतप्रधानपदावर सध्या कार्यरत आहेत. युगांडा हा असा एकमेव देश आहे की, ज्या देशाच्या संसदेत ६३.८ टक्के महिला आहेत. आशियाई देशांमध्ये हे प्रमाण १९ टक्के आहे.

अमेरिकेच्या राष्ट्रपतिपदावर हिलरी क्लिंटन विराजमान होतील आणि तेथे इतिहास घडवतील याकडे जगाचे लक्ष लागले होते, पण तसे घडले नाही. अमेरिकेत एकाही महिलेला हा सन्मान मिळू शकला नाही. त्याआधी जगातील ५९ देशांनी महिलांना सर्वोच्चपदावर कार्य करण्याची संधी दिलेली होती, हे हिलरींच्या राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीवेळी अमेरिकेच्या निदर्शनास आणण्याची संधी जागतिक माध्यमांनी सोडली नाही. अर्जेंटिनाच्या ईसाबेल पेरॉन हा जगातील पहिल्या महिला अध्यक्ष म्हणून १९७४ ला पदावर आल्या. अर्थात नियुक्ती, निवड आणि परंपरेने यापैकी कोणत्या तरी एका पद्धतीचा अवलंब अनेक देशांमध्ये केला जातो. अर्जेंटिनानंतर आइसलँड, मालटा, फिलिपाईन्स, निकारगुआ, श्रीलंका, गियाना, स्वीत्झर्लंड, लॅटव्हिया, पनाना, फिनलंड, इंडोनेशिया, नायजेरिया, चिली अशा अनेक देशांचा क्रमांक लागतो. जगातील पहिल्या पंतप्रधान श्रीमावो भंडारनायके १९६०-६५ या पाच वर्षांच्या कालावधीत श्रीलंकेच्या निवडून आलेल्या पंतप्रधान होत्या. त्यानंतर इंदिरा गांधी १९६६-१९७७, नंतर पुन्हा १९८०-१९८४ या कालावधीत पंतप्रधान म्हणून कार्यरत होत्या. इस्रायलच्या गोल्डा मायर आणि सेंट्रल आफ्रिकन रिपब्लिक डोमोनिका, नॉर्वे, पाकिस्तान, युगोस्लाव्हिया, बांगलादेश, पोलंड, तुर्की, न्यूझीलंड व इतर अनेक देशांनी पंतप्रधानपदी महिलांना नेतृत्व करण्याची संधी दिली. आशियाई देशांमध्ये इंदिरा गांधी, बेनझीर भुत्तो, खलिदा झिया, श्रीमावो भंडारनायके, शेख हसीना यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. जगातील पंतप्रधानपदावर असणाऱ्या प्रभावी महिला पंतप्रधान म्हणून ब्रिटनच्या मार्गरिट थॅचर (१९७९-८०) यांचा उल्लेख केला जातो. सलग दोनवेळा त्या पंतप्रधान म्हणून निवडून आल्या.

जगातील महिला नेतृत्वाचा राजकीयदृष्ट्या विचार करताना ज्या देशांमध्ये राज्यसत्ताक पद्धती आहे, अशा देशांमध्ये राणी म्हणून प्रमुख पदावर कार्य करणाऱ्या महिलांची संख्या लक्षणीय आहे. भारतात प्रतिभाताई पाटील यांनी बाराव्या राष्ट्रपती म्हणून २००७ मध्ये राष्ट्रपतिपदाची सूत्रे हाती घेतली. डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांच्या राष्ट्रपतिपदाचा करिश्मा असतानाच त्यांची निवड झाली. त्याआधी त्या राजस्थानच्या राज्यपालपदी कार्यरत होत्या. कायद्याची पदवी आणि राज्यशास्त्र व अर्थशास्त्र विषयांत पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या प्रतिभाताई पाटील १९६२ ला महाराष्ट्राच्या विधिमंडळात निवडून आल्या. त्या राज्यसभा व लोकसभेमध्ये सदस्य होत्या. सध्या होऊ घातलेल्या राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीसाठी उमेदवारी जाहीर होण्यापूर्वी परराष्ट्र मंत्री सुषमा स्वराज व झारखंडच्या राज्यपाल द्रोपदी मुरमू यांच्याही नावाची चर्चा झाली, तर देशातील लोकसभेच्या पहिल्या महिला अध्यक्ष म्हणून ज्यांची ओळख आहे त्या मीराकुमार या राष्ट्रपतिपदासाठी उमेदवार आहेत. कॅप्टन लक्ष्मी सहगल यांनी अब्दुल कलाम यांच्याविरोधात, तर मनोहरा होळकर यांनी डॉ. झकीर हुसेन यांच्याविरोधातील आठ उमेदवारांपैकी एक, तर व्ही. व्ही. गिरी यांच्यावेळी फुरचरण कौर यांनी उमेदवारी अर्ज भरला होता. देशाच्या सर्वोच्च पदावर कार्य करण्याची संधी यापूर्वी महिलांना मिळालेली आहे; पण आता या पदावर आपल्या राजकीय कर्तृत्वाने पात्र असलेल्या राजकीय महिला नेत्यांची चर्चा होत आहे, हे खरोखरच खूपच चांगले चित्र आहे.

• डॉ. निशा मुडे-पवार
nishapawar1968@rediffmail.com